# शेजारी व एकमेकांची सेवा करण्यासाठी मंडळीला संघटित करा


यकोबाने यरुशलेमेमध्ये केले तसे सूज्ञपणे देवाच्या लोकांवर लक्ष ठेवा.

मुलांना शिकवणाऱ्यांनी O1b हा अभ्यास वाचावा.

**1. देवाचे वचन व प्रार्थनेच्या द्वारे आपल्या अंत:करणाची तयारी करा.**

आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग कसा करावा हे 1 करिंथ अध्याय 12–14 मध्ये माहा.

- देव कोणाच्या भल्यासाठी आम्हांला आध्यात्मिक कृपादाने देतो. *(1 करिंथ 12:4–7)*
- विश्वासणाऱ्याला कोणते कृपादान द्यायचे हे कोण ठरवते. *(1 करिंथ 12:8–11)*
- कृपादाने व त्यांचा उपयोग ह्यांची तुलना कशाशी केली आहे *(1 करिंथ 12:12–31)*
- आमच्या कृपादानांचा उपयोग करण्यामागचा योग्य उद्देश्य *(1 करिंथ 12:31, 13:1–13)*
- एकाच कृपादानावर दिला जाणारा अधिक भर कसा कमी करायचा *(अध्याय 14).*




देव विश्वासणाऱ्यांना निरनिराळी कृपादाने देतो. बरेचदा तो एकापेक्षा अधिक कृपादाने देतो. यामुळे आपल्याला एकमेकांची आणि आपल्या शेजाऱ्यांची सेवा करता येते.

- एखाद्या शरीरातील अवयव एकत्रितपणे कार्य करतात त्याप्रमाणे पवित्र आत्मा प्रीतीमधील आमच्या विविध कामांचा ताळमेळ घालतो.
- रोम 12:4–8; 1 करिंथ 12 आणि इफिस 4:11–16 ह्या शास्त्रभागांमध्ये अनेक आध्यात्मिक कृपादानांची यादी दिली आहे.

**देवाने प्रत्येक मंडळीला नेमून दिलेली कामे करण्यासाठी सूज्ञपणे देखरेख करणारा विश्वासणाऱ्याना एकत्रित करतो.**

- दु:खी पीडीत लोकांची सेवा करा (मत्तय 25:31–46) आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करा (योहान 16:24). प्रार्थनेच्या सेवेमध्ये मध्यस्थीची प्रार्थना आणि दुष्ट आत्म्यांविरुद्धचे आध्यात्मिक युद्ध ह्यांचा समावेश आहे. याच्याशी मिळत्या जुळत्या गोष्टी अंत:करणाचे दोन भाग दाखवतात आस्था (रोम 12:8) आणि विश्वास (1 करिंथ 12:9) ही कृपादाने. ही दोन कृपादाने विश्वासाने एकत्रित कार्य करतात तेव्हा आमच्या तारणामुळे सत्कृत्ये घडतात (इफिस 2:8–10). विश्वास असणाऱ्या अनेकांना येशूने आरोग्य दिले. यात कुष्ठरोगी व शताधिपती यांचाही समावेश आहे (मत्तय 8:1–13). जुन्या करारातील विश्वासणाऱ्यांनी त्यांच्या कृत्यांद्वारे महान विश्वासाचे दर्शन घडवले (इब्री. 11)
- इतरांना ख्रिस्तामध्ये वाढण्यासाठी बोध आणि मदत करा (कलस्सै 1:28). मेंदूचे दोन भाग आम्हांला सूज्ञता व ज्ञानाची (1 करिंथ 12:8) कृपादानांची आठवण करुन देतात. शलमोन याचे उदाहरण आहे (1 राजे 3:5–28)

- लोकांचे सांत्वन करा (2 करिंथ 1:3-7) आणि आध्यात्मिक समस्या तारतम्याने जाणून घ्या (1 करिंथ 2:14). दोन डोळे, भविष्यकथन (याचा उपयोग मुख्यत्वे करुन सांत्वन आणि सामर्थ्य यासाठी होतो, 1 करिंथ 14:2-3) आणि आत्मे ओळखण्याच्या (1 करिंथ 12:10) कृपादानाशी जुळणारे आहेत. ही दोन्ही कृपादाने यशयाच्या ठायी पहायला मिळतात (यशया 40:1-14).

- विश्वासणाऱ्यांना त्यांच्या मंडळीची उन्नत्ती करण्यास आणि पुढाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास तयार करा (इफिस 4:11-12) मुख म्हणजे शिकवण्याचे कृपादान होय (1 करिंथ 12:28). एज्रा (नहेम्या 8) तसेच पौल (2 तीमथ्य 2:2) ह्या कृपादानाचे उदाहरण आहे.

- विश्वास न ठेवणाऱ्या परकीय मनुष्याशी त्यांच्या भाषेत बोलून त्यांना खात्री पटवून द्या (1 करिंथ 14:22). भाषा म्हणजे विशेष प्रकारच्या भाषा बोलण्याचे कृपादान (1 करिंथ 12:10). पेंटोकोस्टच्या दिवशी प्रेषितांनी विशेष भाषांमध्ये भाषण केले (प्रे.कृ. 2:1-18).

- विश्वासणारे व त्यांच्या पुढाऱ्यांना विश्वासात दृढ ठेवा आणि देवाने देऊ केलेले काम करा (1 करिंथ 14:26, प्रे.कृ. 14:21-22). दोन कान हे प्रोत्साहन देण्याचे (लोकांना बोध करुन त्यांची सेवा करण्यासाठी लोकांचे ऐका, रोम 12:8) आणि भाषांचा अर्थ सांगण्याच्या कृपादानाचे (1 करिंथ 12:10) उदाहरण आहे. पौलाने इफिसच्या वडीलजनांना प्रोत्साहन दिले (प्रे.कृ. 20:17-38).

- ख्रिस्तरूपी शरीराची सेवा करा आणि इतरांच्या गरजांची काळजी घ्या (गलती 5:13; 6:10) दोन हात हे सेवा (रोम 12:7) व मदत करणे (1 करिंथ 12:28) ह्या कृपादानांचे प्रतिक आहे. यरुशलेमेतील आरंभीच्या सेवकांनी विधवांची काळजी घेतली (प्रे.कृ. 6:1-6).

- आजाऱ्यांना बरे करा (लूक 10:9) आणि दान द्या (लूक 6:38). दोन हातांचे आरोग्य व अद्भुत चमत्कार (1 करिंथ 12:9-10) आणि दान देणे (रोम 12:8) ह्या कृपादानांची आठवण करुन देतात. पौलाने पुब्ल्याच्या वडीलांना बरे केले (प्रे.कृ. 28:7-8) आणि दुर्कसने संतोषाने दान दिले (प्रे.कृ. 9:36).

- इतरांना अनुकरण करण्यासाठी मार्ग दाखवा (1 करिंथ 11:1) दोन पाय नेतृत्व करणे (रोम 12:8) आणि व्यवस्था करणे (1 करिंथ 12:28) ही कृपादाने दाखवतात. दावीदाने दोन्ही गोष्टी केल्या (1 शमुवेल 23:1-5; 2 शमुवेल 5).

- ख्रिस्ताची घोषणा करा (लूक 24:46-48; प्रे.कृ. 1:8), दोन पावले प्रेषितपणा (मिशनरी) आणि सुवार्ता प्रसार (इफिस 4:11-12) ह्या गोष्टी सुचवतात. पौलाच्या ठायी ह्या दोन्ही गोष्टी होत्या (रोम 15:20-21).

**प्रे.कृ. 15:1-31** मध्ये याकोब आणि निरनिराळया मंडळयांचे वडीलजन (यहूदी व यहूदीतर) ह्यांनी धार्मिक रुढीपरंपरां बद्दलचे गंभीर वाद कशा प्रकारे सोडवले आणि ते एकदिलाने काम करु लागले, ते वाचा. यरुशलेमेतील मंडळयांमध्ये दोन मुख्य संस्कृती उघडपणे दिसत होत्या तेव्हा याकोब हा तेथील प्रमुख मेंढपाळ-पाळक होता.

**पार्श्वभूमी.** शतकानुशतके यहूदी लोक जुन्या करारातील नियमशास्त्राचे पालन करीत होते. यामध्ये पशूंचे यज्ञार्पण, कोणी वारस नसेल तर भावाच्या विधवा पत्नीशी विवाह करणे, शनिवारी काम करणाऱ्याला जिवे मारणे, उपासना फक्त यरुशलेमेत जाऊनच करणे, या आणि यासारख्या अनेक नियमांचा त्यात समावेश होता.

- ख्रिस्तामधील बहुतेक यहूदीतर विश्वासणाऱ्यांना इस्राएलाच्या ह्या प्राचीन नियमशास्त्राची काहीही माहिती नव्हती. अगदी आजही, काही विश्वासणारे पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन घेण्याचे सोडून जुने नियमशास्त्र पूर्ण करतो असे त्यानेच सांगितले आहे (मत्तय 22:37-40, रोम 13:8-10). प्रीती हे पवित्र आत्म्याचे फळ आहे (गलती, 2:22). देवाने जुन्या कराराच्या जागी नवा करार कसा ठेवला हे जाणून घेण्यासाठी 2 करिंथ 3:6-18 आणि इब्री. 8:6-13 वाचा.

**प्रे.कृ. अध्याय 15 मध्ये पाहा :-**

- तारण होण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी काही यहूदी विश्वासणूायांना काय वाटत होते. *(उत्तर : पाहा प्रे.कृ. 15:1)*
- विश्वास ठेवणूाया परुशी लोकांनी (काटेकोरपणे नियमशास्त्र पाळणारा यहूदी पंथ) यहूदीतर लोकांवर कोणता नियम पाळण्याची सक्ती करायची होती. *(पाहा प्रे.कृ. 15:2-5 जुन्या करारातील नियमशास्त्र हे प्राचीन इस्राएलसाठी होते नव्या करारासाठी नाही).*
- पेत्राचा सल्ला *(पाहा प्रे.कृ. 15:6-11).*
- कोणत्या लोकांमध्ये देव अद्‌भुतप्रकारे कार्य करीत असल्याचे पौल व बर्णबालाआढळून आले. *(पाहा प्रे.कृ. 15:12)*
- समस्या सोडवण्यासाठी याकोबाने कोणता उपाय सुचवला. *(पाहा प्रे.कृ. 15:13-21)*
- परिणाम *(पाहा प्रे.कृ. 15:22-31).*

**2. सहकाूयांशी चर्चा करुन आठवडयातील कार्यक्रमांची आखणी करा**

अद्याप इतरांची सेवा न करणूाया विश्वासणूायांची भेट घेऊन त्यांना सेवा करण्यासाठी मदत करा. तुमच्या मंडळीतील सदस्यांमध्ये वर दिलेल्या कोणत्याही कामाची उणीव असेल तर ते काम सुरु करा.

**3. सध्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी येणूाया उपासना सभेची सहकाूयांशी चर्चा करुन आखणी करा.**

देव आमच्याकडून कोणत्या कार्याची अपेक्षा करतो आणि त्याला अनुरूप असणारी कृपादाने याचे तपशील सांगा. याकोब व इतरांनी विश्वासणूायांमध्ये कसा मेळ घातला याचे स्पष्टीकरण करा. वर दिलेले प्रश्न विचारा.

**मुलांनी** तयारी केलेल्या गोष्टींचे सादरीकरण करावे.

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देण्यासाठी योहान 17:18-24 वाचा. येशूने प्रभुभोजनाची स्थापना केली तेव्हा त्याने आमच्या प्रीतीपूर्ण ऐक्यासाठी प्रार्थना केली हे स्पष्ट करा.

आध्यात्मिक कृपादानांविषयी चर्चा करणे, योजना आखणे आणि एकमेकांसाठी प्रार्थना करणे याकरीता दोन वा तीन जणांचे गट तयार करा.

**पाठ करा** इफिस 4:14-17

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू इतर लोकांचा कृपादानांचा आदर करण्यास आणि आमच्या कृपादानाविषयी आम्ही फुशारकी मारु नये याकरीता आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net